Lyceum India Journal of Social Sciences || ISSN (Online): 3048-6513
Volume: 3 Issue: 3 || February 2026 (Special Issue 1) || DOI: 10.5281/zenodo.18844095

# अन्न सुरक्षा योजनेची शाश्वत विकासातील भूमिका: कुपोषण एक प्रमुख समस्या

रेश्मा गांधी पटाईत[1] & प्रा. डॉ. डी. बी. नागरगोजे[2]

**गोषवारा :**

मानव समाजशील प्राणी आहे शेवटी समाजातच त्याचे अस्तित्व शक्य आहे. मानव ज्या समाजात राहतो जन्म घेतो तेथील संस्कृती आणि समाज त्याचबरोबर तेथील बाह्य आणि आंतरिक परिस्थिती त्यांच्या जीवनास प्रभावित करते. तेथील सामाजिक वातावरण आरोग्यासाठी अनुकूल असणे ही समाजाचे बाह्य आणि आंतरिक शांती जीवनात आणण्यास मदत करते सामाजिक परिस्थिती व सांस्कृतिक मान्यता आरोग्यासाठी नेहमीच उपयुक्त आणि प्रेरक असतात. सामाजिक वातावरण निरोगी असेल, परिसर स्वच्छ असेल तरच समाजाचे आरोग्य अबाधित राहते.

**कीवर्ड :** अन्नसुरक्षा, कुपोषण, अल्पपोषण, अतिपोषण

**प्रस्तावना :**

जगातील 840 दशलक्षाहून अधिक लोक दीर्घकाळ कुपोषणाने पीडित आहेत. भारतातही 2021 आणि 2023 मध्ये 19.46 करोड कुपोषित लोक असल्याचे आढळून आले ज्यांची संख्या एकूण लोकसंख्येच्या 13.7% इतकी होती. कुपोषण एक गंभीर स्थिती आहे ची शरीरात आवश्यक पोषण तत्वे प्रोटीन विटामिन खनिज हे मिळाले नाही तर ती समस्या जाणवते ज्यामुळे शारीरिक आणि मानसिक विकास थांबू शकतो भारतात ही एक मोठी समस्या आहे कुपोषण म्हणजे तो एखादा आजार नसतो पण उपासमार अयोग्य आहार व जीवनसत्वाचा अभाव यांच्या परिणामामुळे तो जाणवतो. हा संसर्गजन्य आजार जरी नसला तरी त्याचे प्रमाण सर्व दूर दिसून येते बालकांच्या आहारातील कर्बोदके प्रथिने जीवनसत्व खनिजे यांच्या कमतरतेमुळे कुपोषण हा आजार निर्माण होतो.

**कुपोषणाचा अर्थ** : कुपोषण म्हणजे शरीराला आवश्यक असलेल्या पोषक तत्वाचे प्रथिने, ऊर्जा, जीवनसत्वे, खनिजे, अयोग्य अपुरे किंवा अति प्रमाणात सेवन करणे होय.

**कुपोषणाचे मुख्य प्रकार :**

1. **अल्पपोषण**: आवश्यक पोषक तत्वे न मिळाल्याने शरीराचे वजन कमी होते, उंची वाढत नाही, वयानुसार वजन कमी असणे, जीवनसत्वाची कमतरता जाणवणे अशा समस्या अल्पपोषण या घटकात आढळून येतात.
2. **अतिपोषण:** गरजेपेक्षा जास्त कॅलरीज घेतल्यामुळे वजन वाढणे किंवा लठ्ठपणा येणे.
3. **सूक्ष्म पोषक तत्वांची कमतरता** : शरीरासाठी आवश्यक जीवनसत्वे आणि खनिजांच्या कमतरतेमुळे होणारे आजार

---

[1] संशोधक विद्यार्थी, विभागप्रमुख अर्थशास्त्र विभाग, स्वा. सावरकर महाविद्यालय बीड.
[2]

**संशोधन लेखाचे उद्दिष्टे**

1. अन्नसुरक्षा योजनेतील कुपोषणाच्या स्थितीचा अभ्यास करणे.
2. भारतातील कुपोषणाची समस्या जाणून घेणे.

**गृहीतके :**

1. अन्नसुरक्षा योजनेतील कुपोषण ही एक प्रमुख समस्या बनलेली आहे.
2. भारतातील कुपोषणाच्या समस्येवर पोषण युक्त सकस आहार आणि अन्नधान्य  वितरण हा उपाय आहे.

**कुपोषण एक समस्या :**

सध्या भारत देश अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण असला तरी देशात खूप मोठ्या प्रमाणात अन्नाच्या संबंधित समस्या आहेत. त्यामधील सर्वात महत्त्वाची समस्या म्हणजे कुपोषण होय. कारण देशात केवळ अन्नधान्य मुबलक प्रमाणात उपलब्ध असून चालणार नाही तर ते गरजू आणि सामान्य जनतेपर्यंत वेळेवर व योग्य दरात पोहोचणे ही तितकेच महत्त्वाचे असते.

नोबेल पारितोषिक विजेते **अमर्त्य सेन** यांच्या मते दुष्काळामध्ये अनेक लोकांचे भूक बळी जातात त्याचे प्रमुख कारण म्हणजे अन्नधान्याची कमतरता हेच असते असे नाही तर जनतेकडे ते खरेदी करण्याची आर्थिक क्षमता नसते. त्यामुळे लोकांना उपासमारींना सामोरे जावे लागते. याच आर्थिक समस्यामुळे देशांमध्ये कुपोषणाचे प्रमाण वाढताना दिसते आहे. हे प्रमाण वाढण्याचे प्रमुख कारण आर्थिक सुबत्ता नसणे हेही आहे असेच म्हणावे लागेल.

2021 मध्ये भारतातील ०६ वर्षापर्यंतच्या सर्व मुलांची अंदाजे लोकसंख्या 16.1 कोटी आहे. पोषण ट्रकरच्या ऑक्टोबर 2024 आकडेवारीनुसार 8.82 कोटी मुले (०-६) वर्ष अंगणवाड्यामध्ये नोंदणीकृत आहेत. त्यापैकी 8.55 कोटी मुले वाढीच्या निकषावर मोजली गेली, यापैकी ०-६ वर्ष वयोगटातील 37% मुलांची वाढ खुंटलेली आढळून आली, तर 17 % मुले कमी वजनाची आढळली आहेत.

भारतात ऑक्टोबर 2024 च्या आकडेवारीनुसार ०५ वर्ष वयोगटातील 7.54 कोटी मुलांची अंगणवाडीत नोंदणी आहे. आणि महिला व बाल विकास मंत्रालयाच्या पोषण ट्रॅकरवर नोंदणी झालेली आहे. त्यापैकी 7.31 कोटी मुलांची उंची आणि वजनाच्या वाढीच्या मापदंडावर मोजमाप करण्यात आले, यापैकी 38.9% मुले वाढत्या प्रमाणात वाढलेली नाही तर 17 % मुले कमी वजनाची आहेत.

**जागतिक स्तरावरील कुपोषणाची स्थिती:**

जगभरातील लाखो लोक अन्न असुरक्षिततेने आणि विविध प्रकारच्या कुपोषणाने ग्रस्त आहेत कारण निरोगी आहाराचा खर्च परवडत नाहीत. पौष्टिक आहाराच्या किंमतीत खूप मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे अनेक लोकांचे उत्पन्न कमी असल्याकारणाने लोकांना सकस आहार न परवडणारा आहे. वाढती अन्न असुरक्षितता आणि कुपोषणाचे सर्व प्रकार ज्यात वाढ होते सूक्ष्म अन्नद्रव्याची कमतरता, जास्त वजन, लठ्ठपणा आणि असंसर्गजन्य रोग, ही कारणे याला जबाबदार आहेत तसेच .त्यामुळे कुपोषण वाढतच चालले आहे .2020 मध्ये कोविड-19 या साथीच्या रोगामुळे जगभरात महामारी सारखी समस्या निर्माण झाली. या साथीच्या रोगापूर्वी )SDG) लक्ष 2.1 आणि 2.2 पूर्ण करण्याच्या दिशेने प्रगती आधीच ठप्प झाली होतीउपासमार संपवणे आणि सर्व लोकांना वर्षभर सुरक्षित पौष्टिक आणि पुरेशा अन्नाचा प्रवेश सुनिश्चित करण .ा आणि सर्व प्रकारचे कुपोषण निर्मूलन करणे कठीण झाले होते त्यामुळे .2020 मध्ये जगात भुकेनेग्रस्त लोकांची संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ झाली होती.

Lyceum India Journal of Social Sciences || ISSN (Online): 3048-6513
Volume: 3 Issue: 3 || February 2026 (Special Issue 1) || DOI: 10.5281/zenodo.18844095


जागतिक स्तरावरील कुपोषणाचा प्रादुर्भाव 2005 ते 2020 पर्यंत खालील तक्त्यात दर्शविलेला आहे.

**तक्ता क्र.1.1**

**जागतिक स्तरावरील कुपोषणाचा प्रादुर्भाव 2005 ते 2020**

| अ. क्र. | जागतिक स्तरावरील कुपोषणाचा प्रादुर्भाव | कुपोषणाचा प्रसार | कुपोषित लोकांची संख्या |
|---|---|---|---|
| 1. | २००५ | १२.४ | ८१०.७ |
| 2. | २०10 | ९.२ | ६३६.८ |
| 3. | २०1५ | ८.३ | ६१५.१ |
| 4. | २०16 | ८.३ | ६१९.६ |
| 5. | २०17 | ८.1 | ६१५.० |
| 6. | २०18 | ८.३ | ६३३.४ |
| 7. | २०19 | ८.4 | ६५०.३ |
| 8. | २०20 | ९.९ | ७६८.० |

**स्त्रोत:** FAO, Report, 2021.




वरील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे 2015 ते 2019 पर्यंत अपरिवर्तित राहिल्यानंतर जगातील अन्नसुरक्षा आणि पोषण पीओयू प्रसार 8.4% वरून 2019 ते 2020 मध्ये 9.9% झालेले दिसून येते तसेच जगातील .2020 मध्ये 720 ते 811 दशलक्ष लोक उपासमारीला सामोरे गेले होतेअंदाजीत . श्रेणी (768 दशलक्ष मध्यभागी ( विचारात घेता हे प्रमाण 2019 च्या तुलनेत 2020 मध्ये खूपच जास्त होते असे दिसून येते.

कमकुवत आर्थिक स्थितीमुळे बऱ्याच कुटुंबातील लोकांना आपली अन्नाची गरज भागविण्याकरता दिवसभर काभाड कष्ट करावे लागते, त्यानंतर कुठे त्यांना दोन वेळेसचे अन्न मिळते. अशा मध्यमवर्गीय आणि गरीब कुटुंबात सकस आणि पौष्टिक आहार न मिळाल्यामुळे भारतात कुपोषणाचे प्रमाण हे मोठ्या प्रमाणावर वाढताना दिसत आहे. याचे सर्वाधिक बळी हे ०६ वर्ष वयोगटातील बालके मोठ्या प्रमाणात असल्याचे आढळून येते. या अनुषंगाने शासन स्तरावर गहन चर्चा होऊन तातडीने उपाय योजना करण्याची गरज आहे.

**निष्कर्ष :**

कुपोषण ही एक अशी विकृतज्यन्य दशा आहे की जी एखादा पोषक घटक शरीरात कमी अथवा अधिक अधिक झाल्यानंतर उत्पन्न होतो. कुपोषणाची प्रमुख कारणे, संतुलित आहारासंबंधी अज्ञानता, गरिबी, अंधविश्वास, सामाजिक परंपरा इत्यादी कारणे आहेत. कुपोषणाचा प्रभाव मानवी स्वास्थ्य तर बाधित करतेच याशिवाय समाज आणि देशाचा सामाजिक व आर्थिक विकासही बाधित होतो.

1. भारतातील कुपोषणाची समस्या ही एक गंभीर सार्वजनिक आरोग्याची समस्या असून ती मुख्यत्वे गरिबी, अस्वच्छता, पोषक आहाराचा अभाव, अस्वच्छता, पिण्याच्या पाण्याची अनुपलब्धता आणि शिक्षणाच्या कमतरतेमुळे उद्भवते.
2. भारताने गेल्या काही दशकापासून कुपोषण कमी केले आहे. त्याअनुषंगाने अनेक सरकारी कार्यक्रम सुरू आहेत तरीही कुपोषण दूर होण्यास शासनास पाहिजे तसे यश आलेले दिसत नाही. आजही कुपोषणाच्या अनुषंगाने संशोधन होणे आवश्यक आहे. त्याचबरोबर योजनांची अंमलबजावणी अधिक काटेकोर होणे ही तितकेच महत्त्वाचे आहे.
3. आर्थिक प्रगती असूनही भारत कुपोषणाशी लढण्यात अपयशी ठरला आहे. ज्यामुळे देशाच्या सामाजिक - आर्थिक प्रगतीवर प्रतिकूल परिणाम होतांना दिसतो आहे. त्यामुळे विकसित राष्ट्राच्या दिशेने मार्गक्रमण करताना कुपोषण ही एक प्रमुख बाधा समजली जाते.

**समारोप :**

विकसनशील देशांमध्ये भारतात सर्वाधिक कुपोषित मुलांची संख्या आहे. भारतातील जवळजवळ निम्मी मुले कुपोषित आहेत आणि दरवर्षी जवळपास दहा लाख मुले ही एक महिन्याच्या आतच मरतात. अनेक नवीन माता किशोरवयीन असतात, त्यापैकी बहुतेक अशक्त असतात. 2000 ते 2020 दरम्यान कुपोषणाच्या प्रमाणामध्ये घट झाली असली तरी भारतात कुपोषणाचे प्रमाण अजूनही खूपच जास्त आहे. कुपोषण, भूक बळी, बालमृत्यू, माता मृत्यू, गरीब आणि दारिद्र्यरेषेखालील लोकांच्या आर्थिक प्रगतीमध्ये वाढ न होणे, सकस आहार, यासारख्या समस्या भारताच्या आर्थिक प्रगतीतील मोठा रोडा बनवून उभ्या आहेत या अनुषंगाने शासनाला ठोस पावले उचलून या समस्या दूर करण्याच्या दृष्टीने काही नवीन योजना, कार्यक्रम, राबविणे आवश्यक आहे. जनमानसात जागृती, लोकसहभाग वाढविणे, जुन्या योजना व धोरणातील अंमलबजावणी प्रक्रिया अधिक पारदर्शक, गतिमान करणे गरजेचे आहे. यासारख्या समस्या कमी झाल्या तर तेव्हा कुठे भारत विकसित राष्ट्रांच्या पंगतीमध्ये बसण्यास मदत होईल.

**संदर्भ सूची :**

1. FAO Report, (2021), 'Food Security and Nutrition in the World, Washington, USA.
2. सिनकर कपालिनी, (ऑक्टोबर २०१८), 'कुपोषण देशाच्या प्रगती प्रगतीतील अडसर', वर्ष, - १, अंक: १०, महाराष्ट्र राज्य महिला आयोग गृहनिर्माण भवन कलानगर, वांद्रे पूर्व, मुंबई.
3. https://www.globalhungerindex.org
4. World Bank. (2009), 'World bank report on malnutrition in India. Washington, DC: The World Bank;
5. NITI Aayog (2016) 'Nourishing India: national nutrition strategy. New Delhi: Government of India;
6. Kumar S, Bhawani L. (2005) Managing child malnutrition in a drought affected district of Rajasthan - A case study. Indian J Public Health; 49:198–206.

**Publisher's Note:** *The views and opinions expressed in this article are solely those of the author(s) and do not necessarily reflect those of the publisher, editors, or the editorial board.*